मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक


epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ५०३ वा ● शनिवार, ता. २४ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००


## छगन भुजबळ ईडीमुक्त

### खटला रद्द; १४ जणांची सुटका

**मुंबई । रयत समाचार**

दिल्लीतील महाराष्ट्र सदनाच्या बांधकामाशी संबंधित कथित गैरव्यवहार प्रकरणात राष्ट्रवादी अजितपवार काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांना अखेर पूर्ण न्याय मिळाला. अंमलबजावणी संचालनालयाने (ED) दाखल केलेला खटला न्यायालयाने रद्दबातल ठरवत भुजबळांसह एकूण १४ जणांना दोषमुक्त केले. यामुळे त्यांच्या निर्दोषतेवर न्यायालयीन शिक्कामोर्तब झाले. महाराष्ट्र सदनाच्या बांधकामात सुमारे ८५० कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराचा आरोप भुजबळ यांच्यावर करण्यात आला होता. या प्रकरणात त्यांना अटक होऊन जवळपास दोन वर्षे कारावास भोगावा लागला. मात्र, याआधीच राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) त्यांना दोषमुक्त ठरविले होते. मुख्य गुन्हाच सिद्ध न झाल्याने पुढे ईडीनेही दोषमुक्तीची भूमिका घेतली होती. त्यानंतर हा खटला न्यायालयात गेला. सविस्तर सुनावणीनंतर न्यायालयाने ईडीचा खटला रद्द करत भुजबळ यांची संपूर्ण सुटका जाहीर केली. या निर्णयामुळे दीर्घकाळ सुरू असलेल्या कायदेशीर लढ्याचा शेवट झाला असून, भुजबळ समर्थकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे. न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करणारा हा निर्णय मानला जात आहे.

## ले. कर्नल सीता शेळके यांना 'सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्कार' जाहीर




**नवी दिल्ली । रयत समाचार**

आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात शौर्य, नेतृत्व आणि अभियांत्रिकी कौशल्याचा आदर्श संगम घडवणाऱ्या अहिल्यानगरच्या सुकन्या लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांना भारत सरकारचा प्रतिष्ठेचा २०२६ चा 'सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्कार' जाहीर झाला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या पराक्रम दिवसाचे औचित्य साधून केंद्र सरकारने ही घोषणा केली. देशभरातून आलेल्या २७१ नामांकनांतून वैयक्तिक श्रेणीसाठी त्यांची निवड झाली आहे. २०२४ मध्ये केरळच्या वायनाडमध्ये झालेल्या भीषण भूस्खलनात ले. कर्नल सीता शेळके यांनी अत्यंत प्रतिकूल हवामानात बचाव मोहिमेचे नेतृत्व करत शेकडो जीव वाचवले. चूरलमाला येथे १९० फूट लांबीचा बेली ब्रिज विक्रमी वेळेत उभारून तुटलेला संपर्क पुन्हा प्रस्थापित केला. त्यामुळे दुर्गम गावांपर्यंत मदत पोहोचवणे शक्य झाले. याशिवाय कोमात्सु २१० एक्सकॅव्हेटरचा कल्पक वापर करून अवघ्या चार तासांत तात्पुरता पादचारी पूल उभारण्याचा त्यांनी दाखवलेला नवोन्मेष मदतकार्याला मोठी गती देणारा ठरला. प्रत्यक्ष कार्यासोबतच त्यांनी आतापर्यंत २,३०० हून अधिक जवानांना आपत्ती निवारणाचे विशेष तांत्रिक प्रशिक्षण दिले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील गाडीलगाव येथील रहिवासी असलेल्या सीता शेळके यांचे वडील अशोक भीकाजी शेळके हे वकील आहेत. मेकॅनिकल इंजिनीअरिंगचे शिक्षण अहिल्यानगरमधून पूर्ण केल्यानंतर, देशसेवेच्या ध्यासातून त्यांनी लष्कराची वाट निवडली. कठीण मानली जाणारी परीक्षा उत्तीर्ण करून २०१२ मध्ये चेन्नईच्या ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमीमधून प्रशिक्षण पूर्ण करत त्या भारतीय लष्करात अधिकारी म्हणून रुजू झाल्या. महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण. धैर्य, कौशल्य आणि सेवाभावाने देशाला दिलेल्या योगदानासाठी ले. कर्नल सीता शेळके यांना हा सन्मान मिळणे म्हणजे नव्या पिढीसाठी प्रेरणास्थानच आहे.



## ३० चित्ररथ, २५०० कलाकार

### कर्तव्य पथावर सांस्कृतिक शक्तिप्रदर्शन

**नवी दिल्ली । रयत समाचार**

२६ जानेवारी रोजी देशभरात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात आणि अभिमानाने साजरा केला जाणार आहे. नवी दिल्लीतील कर्तव्य पथावर होणारी भव्य परेड आणि विविध कार्यक्रम हे यंदाच्या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. 'वंदे मातरम्' गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर यंदाचा प्रजासत्ताक दिन एकता, विविधता आणि प्रगती या मुख्य विषयांवर साजरा होणार आहे. यंदाच्या प्रजासत्ताक दिन परेडचे मुख्य अतिथी म्हणून युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष एंटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयेन उपस्थित राहणार आहेत. परेडची सुरुवात सकाळी ९.३० वाजता राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकवून वंदे मातरम् गीताच्या १५० वर्षांचा गौरव साजरा करून होणार आहे. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता कर्तव्य पथावर मुख्य परेड सुरू होईल. ही परेड साधारण दीड ते दोन तास चालणार आहे. कर्तव्य पथावर यंदा एकूण ३० चित्ररथ सादर होणार असून विविध राज्यांची संस्कृती, परंपरा, पर्यटन, नवोन्मेष आणि विकास यांचे दर्शन त्यातून घडणार आहे. ''स्वतंत्रता का मंत्र : वंदे मातरम्'' आणि ''समृद्धि का मंत्र : आत्मनिर्भर भारत'' या विषयांवर आधारित चित्ररथांमधून देशाचा इतिहास आणि आधुनिक प्रगतीचा प्रवास उलगडणार आहे. यंदाच्या परेडमध्ये 'ऑपरेशन सिंदूर' या थीमवर आधारित चित्ररथ विशेष आकर्षण ठरणार असून त्यामध्ये भारतीय सैन्याचे सामर्थ्य तसेच राफेलसह अन्य लढाऊ विमानांचे प्रतीकात्मक सादरीकरण पाहायला मिळणार आहे. लष्कर, नौदल आणि वायुसेना यांचा सहभागही यंदाच्या सोहळ्यात महत्त्वाचा ठरणार आहे. वायुसेनेचे 'सिंदूर' फॉर्मेशन फ्लायपास्ट हे विशेष आकर्षण राहणार असून यामध्ये राफेल, सुखोई-३० आणि मिग-२९ यांसारखी लढाऊ विमाने सहभागी होणार आहेत. परेडदरम्यान सुमारे २,५०० कलाकार पारंपरिक नृत्य, संगीत व विविध कला सादर करणार असून देशाच्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन एकाच मंचावरून घडणार आहे. कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर कर्तव्य पथ परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था व सीसीटीव्हीद्वारे देखरेख ठेवण्यात आली आहे.

## ५० टक्के टॅरिफवरुन गांधींचा मोदींवर हल्लाबोल

### वस्त्रोद्योग संकटात असल्याचा आरोप



**नवी दिल्ली । रयत समाचार**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेने भारतीय वस्त्रोद्योगावर लावलेल्या ५० टक्के टॅरिफमुळे उद्योगासमोर मोठे संकट उभे राहिल्याचा दावा करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीकास्त्र सोडले. अमेरिकन टॅरिफमुळे वस्त्रोद्योग प्रचंड अनिश्चिततेत सापडला असून याचा फटका रोजगार आणि निर्यातीवर होत असल्याचे त्यांनी म्हटले. हरियाणातील गुरुग्रामजवळील एका वस्त्रोद्योग कारखान्याला भेट देत राहुल गांधी यांनी कामगार आणि व्यवस्थापनाशी संवाद साधला. या दौऱ्याचा व्हिडिओ त्यांनी यूट्यूबवर शेअर केला. यावेळी त्यांनी, ''मोदीजी, या विषयावर तुमची थेट जबाबदारी आहे. कृपया याकडे गांभीर्याने लक्ष द्या,'' असे आवाहन केले. राहुल गांधी म्हणाले की, भारतातील वस्त्रोद्योग रोजगार निर्मितीच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचे मोठे क्षेत्र आहे. भारतीय कपड्यांना जागतिक बाजारपेठेत मागणी असून कारागिरांचे कौशल्यही उल्लेखनीय आहे. मात्र अमेरिकेच्या टॅरिफमुळे या क्षेत्रात अस्थिरता वाढली आहे. अमेरिकेच्या टॅरिफबरोबरच युरोपमध्ये किंमती घसरत असून बांगलादेश व चीनकडून तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे भारतीय निर्यातदारांवर सर्व बाजूंनी दबाव वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. याचा परिणाम उद्योगावर थेट होऊन ऑर्डर कमी होणे, कारखाने बंद पडणे आणि रोजगारावर परिणाम होण्यासारख्या परिस्थिती निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला. सरकारने या विषयावर कोणतीही ठोस भूमिका न घेतल्याची टीका करत राहुल गांधी यांनी ''देशात कोट्यवधी नोकऱ्या आणि लाखो लघुउद्योग धोक्यात असताना सरकार शांत आहे,'' असे म्हटले. तसेच भारताने अमेरिकेसोबत भारतीय उद्योग आणि कामगारांना प्राधान्य देणारा व्यापार करार करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## राजकारणाच्या वर्तमान आणि भविष्याचा वेध : प्रा. सुहास पळशीकर




**पुणे । रयत समाचार**

ज्येष्ठ राजकीय अभ्यासक प्रा. सुहास पळशीकर यांच्या 'राजकारण जिज्ञासा' या नव्या पुस्तकाच्या निमित्ताने महाराष्ट्र, देश तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदलते प्रवाह, न्यायव्यवस्था आणि राजकारणातील परस्परसंबंध यांवर सखोल चर्चा करणारा परिसंवाद शनिवारी ता.२४ जानेवारी रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे.फ 'देश-विदेशातील राजकारण कोणत्या दिशेने जात आहे?' या मध्यवर्ती विषयावर होणाऱ्या या परिसंवादात राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकीय घडामोडींचे विश्लेषण केले जाणार आहे. तसेच न्यायव्यवस्था आणि राजकारण यांच्यातील परस्पर संबंध, लोकशाही मूल्यांची सद्यस्थिती आणि राजकीय व्यवस्थेतील बदल यावरही विचारमंथन होणार आहे. या परिसंवादात विविध क्षेत्रांतील अभ्यासक व पत्रकार सहभागी होत आहेत. आरती मोरे महाराष्ट्रातील राजकारणावर आपले मत मांडणार असून, अभिजीत कांबळे दिल्लीच्या राजकीय घडामोडींच्या दृष्टिकोनातून देशातील राजकारणाचा आढावा घेणार आहेत. आंतरराष्ट्रीय संबंधांचे अभ्यासक संकल्प गुर्जर भारताची शेजारी राष्ट्रे तसेच युरोप- अमेरिकेतील राजकीय घडामोडी स्पष्ट करतील. तर विधी क्षेत्रातील अभ्यासक प्रा. प्रतापसिंह साळुंखे न्यायव्यवस्था आणि राजकारण यांच्यातील गुंतागुंतीच्या नात्यावर प्रकाश टाकणार आहेत तर समारोपात पुस्तकाचे लेखक प्रा. सुहास पळशीकर हे आपले विचार मांडणार आहेत. संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत, एम. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशन, नवी पेठ, पुणे येथे होणाऱ्या या परिसंवादाला प्रवेश मुक्त ठेवण्यात आला आहे.

## रुपया ऐतिहासिक तळाला ६ महिन्यांतील सर्वात मोठी घसरण

**मुंबई । रयत समाचार**

परकीय गुंतवणूकदारांनी सातत्याने काढलेला निधी आणि आयातदारांनी वाढवलेली डॉलरची मागणी (हेजिंग) यामुळे भारतीय रुपया शुक्रवार, ता. २३ जानेवारी २०२६ रोजी ऐतिहासिक नीचांकी पातळीवर पोहोचला.

या घसरणीमुळे रुपयाने गेल्या सहा महिन्यांतील आपली सर्वात मोठी साप्ताहिक घसरण नोंदवली आहे. शुक्रवारी व्यवहारादरम्यान रुपया ९२.०० च्या पातळीला स्पर्श करण्याच्या बेतात होता, तो ९१.९६५० या आतापर्यंतच्या सर्वात नीचांकी स्तरावर गेला. बाजार बंद होताना रुपया ९१.९४ वर स्थिरावला. दिवसभरात रुपयात ०.३४ टक्क्यांची घसरण झाली, तर संपूर्ण आठवड्यात १.१८ टक्के आणि महिनाभरात एकूण २.३ टक्क्यांची मोठी घसरण दिसून आली आहे. विशेष म्हणजे, या आठवड्यात डॉलर निर्देशांक कमकुवत झाल्यामुळे आशियातील इतर चलनांमध्ये सुधारणा पाहायला मिळाली, तरीही भारतीय रुपयावर मात्र दबाव कायम राहिला. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ग्रीनलँड संदर्भात दिलेल्या विधानांनंतर जागतिक बाजारात अस्थिरता असतानाही इतर आशियाई चलने सावरली, पण रुपयाची घसरण सुरूच राहिली. रुपयाची ही घसरण रोखण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) या आठवड्यात किमान दोन वेळा बाजारात मोठा हस्तक्षेप केला. बँकेने स्पॉट मार्केटमध्ये डॉलरची विक्री केली आणि तरलतेचे व्यवस्थापन करण्यासाठी बाय/सेल स्वॅप व्यवहारांचा वापर केला. रिझर्व्ह बँकेच्या या हस्तक्षेपामुळे घसरणीचा वेग काहीसा मर्यादित राहिला असला, तरी रुपयाची घसरण्याची मूळ प्रवृत्ती अद्याप बदललेली नाही, असे मत बाजार तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

### घसरणीची प्रमुख कारणे




**गुंतवणूकदारांची माघार: परकीय गुंतवणूकदारांनी (FPI) भारतीय शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक काढून घेण्याचा सपाटा लावला आहे.**

**आयातदारांचे हेजिंग: रुपयाची किंमत आणखी कमी होईल या भीतीने आयातदार आणि कॉर्पोरेट कंपन्यांनी डॉलरचे बुकिंग (हेजिंग) वाढवले आहे.**

**निर्यातदारांची सावध भूमिका: निर्यातदारांनी डॉलर विक्रीचा वेग कमी केल्यामुळे बाजारात डॉलरचा पुरवठा घटला आणि रुपयावर दबाव वाढला.**

## 'मराठी सन्मान यात्रे'त येळ्ळूरचे शेकडो कार्यकर्ते सहभागी होणार

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**



महाराष्ट्र एकीकरण युवा समिती सीमाभागच्या वतीने युवा नेते शुभम शेळके यांच्या नेतृत्वाखाली रायगड येथे निघणाऱ्या मराठी सन्मान यात्रेत येळ्ळूरचे शेकडो कार्यकर्ते व भजनी मंडळ सहभागी होणार असून, यासाठी लक्ष्मी गल्लीतील दत्त मंदिर येथे मराठी सन्मान यात्रेला पाठिंबा देण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रारंभी महाराष्ट्र चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन महाराष्ट्र एकीकरण समितीचे निष्ठावंत कार्यकर्ते वामनराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

नवहिंद को-ऑप. सोसायटीचे चेअरमन शिवाजी सायनेकर तसेच इंजिनिअर हणमंत कुगजी, प्रशांत मजुकर यांच्या हस्ते भगव्या ध्वजाचे पूजन करण्यात आले. या बैठकीत दुद्दापा बागेवाडी यांनी मराठी सन्मान यात्रेला पाठिंबा देत सीमाप्रश्नी युवकांनी सक्रिय सहभाग घेऊन चळवळ बळकट करावी, असे सांगितले. प्रकाश अष्टेकर यांनी येळ्ळूर गावाने सीमालढ्यात अविरत सहभाग दर्शविल्याप्रमाणे युवा वर्गाच्या पाठीशीही गाव सक्रिय सहभाग दर्शवेल, असे सांगितले. खानापूर युवासमितीचे अध्यक्ष धनंजय पाटील यांनी महाराष्ट्र एकीकरण युवा समिती सीमाभाग हा लढा ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सीमाप्रश्न सुटतोवर तेवत ठेवेल, असे आश्वासन देत देणगीदारांचे आभार मानले.

अमोल जाधव, गणेश अष्टेकर, श्रीकांत नांदूरकर आदींनीही आपले विचार व्यक्त केले. मराठी सन्मान यात्रेला येळ्ळूर मराठी साहित्य संमेलन, हिंदवी स्वराज्य युवा संघटना, वारकरी संप्रदाय भजनी मंडळ, छत्रपती विराट गड संवर्धन पथक, छत्रपती विराट हलगी पथक, शेतकरी कामगार गणेशोत्सव (कलमेश्वर गल्ली), शिवसेना (विराट गल्ली), गावातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि दुर्गा माता मंडळ, उषानारायण फाउंडेशन यांनी पाठिंबा जाहीर केला. या उपक्रमासाठी नितेश फकिरा काकतकर रु. २५ हजार, श्रीकांत शिवाजी नांदुरकर रु. १० हजार (दोन क्विंटल तांदूळ), सुनील वामनराव पाटील रु. १० हजार, हणमंत लु. कुगजी रु. ५०५१, अमित य. पाटील रु. ५ हजार, परशराम निंगापा धामणेकर रु. ५ हजार, बाळासाहेब पावले रु. ५ हजार, हिंदवी स्वराज्य संघटना रु. ५ हजार, प्रभाकर मंगणाईक रु. २५०० यांच्यासह कलमेश्वर गल्लीच्यावतीने देणगी देण्यात आली.

श्रीचांगळेश्वरी शिक्षण मंडळचे प्रसाद यल्लोजी मजुकर यांनी २० बॉक्स पाण्याच्या बाटल्यांची देणगी दिली. तसेच मिलिंद अष्टेकर, महेश कुगजी, ऋषी मजुकर, प्रवीण मजुकर यांनी वैद्यकीय किट दिले. यावेळी उदय जाधव, राजू पावले, प्रकाश पाटील, सुरज गोरल, अनिल हुंदरे, गोविंद बापूसाहेब पाटील, रमेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य पिंटू चौगुले, यल्लापा पाटील, सतीश देसुरकर, मनोज कुगजी, विनोद लोहार, संकल्प जाधव, सागर नायकोजी, ओमकार पाटील, सुमंत कुगजी, योगेश कदम, राहुल कुगजी, प्रविण मुचंडी, भावू हलगेकर, किरण उडकेकर, गजानन कुंडेकर, अवधूत लोहार आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन युवा नेते दत्ता उघाडे यांनी केले तर आभार मानण्यात आले.

**येळ्ळूर गाव नेहमीच सीमालढ्याचा अग्रेसर भाग राहिला असून आजही शेकडो कार्यकर्त्यांनी मराठी सन्मान यात्रेत सहभाग दर्शवून सीमाप्रश्नी आपली निष्ठा दाखवून दिली आहे. येळ्ळूर गावाने दाखवलेल्या विश्वासाला तडा न जाऊ देता सीमाप्रश्नाच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करेन.**

**-शुभम शेळके,** युवानेते



## सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याचे मंत्री तवडकर आवाहन

**काणकोण । रयत समाचार**

''चला, काणकोण स्वच्छ करूया'' या घोषवाक्याखाली काणकोण नगरपालिका, लायन्स क्लब काणकोण आणि लिओ क्लब काणकोण यांच्या सहकार्याने पाळोळेच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला भव्य स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवण्यात आले. कला व संस्कृती, क्रीडा व युवा व्यवहार आणि आदिवासी कल्याण मंत्री तथा काणकोणचे आमदार रमेश तवडकर यांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याचे आवाहन केले. काणकोणचे नगराध्यक्ष लक्ष्मण पागी यांच्या उपस्थितीत हे स्वच्छता अभियान पार पडले. यावेळी नगरसेवक रमाकांत नाईक गावकर, सारा नाईक देसाई, सायमन रिबेलो आणि नीतू देसाई उपस्थित होते. काणकोण पालिका कर्मचारी येसो देसाई व इतर कर्मचारी, भाजप काणकोणचे अध्यक्ष प्रभाकर गावकर, विद्यार्थी, शाळकरी मुले, शिक्षक, स्वयंसेवक आणि स्थानिक रहिवाशांनी उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमामुळे काणकोणला स्वच्छ, हरित आणि सुस्थितीत ठेवण्यासाठी सामुदायिक सहभाग, नागरिक जबाबदारी आणि सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित झाले.

# एकदंत गणेश मंडळाकडून गरजू विद्यार्थ्यांना दप्तर वाटप



**अहमदनगर । रयत समाचार**

एकदंत कॉलनी, दातरंगे मळा, अहिल्यानगर येथे श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने गणेश जयंतीच्या पावन पर्वानिमित्त नगर शहरातील १४ शाळांमधील १०० गरजू विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. ''एक पाऊल गरजू विद्यार्थ्यांसाठी'' या सामाजिक संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. शाळा हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे भक्कम माध्यम आहे. शालेय शिक्षणातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक, सामाजिक, मानसिक, शारीरिक तसेच नैतिक विकास घडून येतो. त्यामुळे प्रत्येक मुलाला शिक्षणाची समान संधी मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

मात्र सध्याच्या महागाईच्या काळात शिक्षणही खर्चिक बनले असून अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने काही विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. अशा गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी व त्यांना आधार मिळावा, या उद्देशाने श्री एकदंत गणेश मंडळाने गणेश जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रमाला सामाजिकतेची जोड देत शालेय साहित्य (दप्तर) वाटपाचा उपक्रम आयोजित केला. या उपक्रमांतर्गत नगर शहरातील महंत पंडित सूच्चासिंग विद्यालय, मतिमंद मुलांची शाळा, मार्कंडेय विद्यालय (गांधी मैदान व श्रमिक नगर), महर्षी ग. ज. चीतांबर विद्यामंदिर (सबजेल चौक), शारदा मंदिर, संस्कृती कनोरे विद्यालय, कै. वि. ल. कुलकर्णी प्राथमिक शाळा, मनोहरलाल रामचंद सबलोक प्राथमिक विद्यालय, दादा चौधारी विद्यालय, सिताराम सारडा महाविद्यालय, प्रगत विद्यालय, बत्तीन पोठ्ठ्यांना प्राथमिक शाळा, महिला मंडळ बालक मंदिर आदी शाळांमधील १०० गरजू विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने राबविण्यात येणारा दप्तर वाटप उपक्रम यंदा सहाव्या वर्षात असून आतापर्यंत एकूण ६०० गरजू विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले आहे.

मंडळाकडून दरवर्षी गणेश जयंतीनिमित्त १०० गरजू विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात येते. याच गणेश जयंतीनिमित्ताने मंडळातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र तपासणी, दंत तपासणी शिबिर घेण्यात आले असून मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी आवश्यक तपासणीही करण्यात आली. महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने विविध मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले. यासोबतच मोठ्या उत्साहात हनुमान चालीसा पठण कार्यक्रमही भक्तिमय वातावरणात पार पडला. धार्मिकतेसोबत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. पालक व शिक्षकांनीही श्री एकदंत गणेश मंडळाच्या या सामाजिक उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. २२ जानेवारी २०२६ रोजी गणेश जयंतीनिमित्त अभिषेक, होम-हवन, सत्यनारायण महापूजा, नगर शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य शोभायात्रा तसेच भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने देण्यात आली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशन यांनी केले तर आभार प्रदर्शन विनोदा बेत्ती यांनी मानले.

# कार्याने व विचाराने बाळासाहेब ठाकरे जनसामान्यांचे 'हिंदू हृदयसम्राट' झाले- जाधव

## शिवसेनेकडून स्व. बाळासाहेब ठाकरे यांची जन्मशताब्दी उत्साहात

**अहमदनगर । रयत समाचार**

शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या शंभराव्या जयंतीनिमित्त शहरात शिवसेनेच्या वतीने विविध ठिकाणी अभिवादन व कार्यक्रमांचे आयोजन करून हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मंगलगेट येथील शिवसेनेच्या शहर संपर्क कार्यालय तसेच नेता सुभाष चौक येथे स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शिवसैनिकांनी अभिवादन केले.




यावेळी ''जय भवानी, जय शिवाजी'', ''बाळासाहेब ठाकरे अमर रहें'' अशा जोरदार घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. या अभिवादन कार्यक्रमास शिवसेना शहरप्रमुख सचिन जाधव, नवनिर्वाचित नगरसेवक दत्ता कावरे, संतोष गेनप्पा, संजय शेंडगे, विक्रम राठोड, सुरेश तिवारी, युवासेना जिल्हाप्रमुख योगेश गलांडे, सचिन शिंदे, विजय वडागळे, घनश्याम घोलप, महिला जिल्हाप्रमुख ॲड. स्वाती जाधव, सलोनी शिंदे, तृप्ती साळवे, नीता बर्वे, सुनीता बहुले, पुष्पा येळवंडे, प्रताप गडाख, श्याम सोनवणे, अनिकेत आरडे, चेतन शिरसूळ, विनोद शिरसाठ, रमेश खेडकर, अभिजीत अष्टेकर, कैलास शिंदे, सुनील लालबोंद्रे, संजय छजलाने, रवी लालबोंद्रे, नरेश भालेराव आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरप्रमुख सचिन जाधव म्हणाले की, स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या निर्भीड विचारांनी, स्पष्ट भूमिकेने आणि समाजासाठी केलेल्या कार्यामुळे जनसामान्यांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. त्यामुळेच ते 'हिंदूहृदय सम्राट' म्हणून ओळखले जातात. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे बाळासाहेबांच्या हिंदुत्ववादी विचारधारेतून काम करत असून, त्यांचा वैचारिक व राजकीय वारसा पुढे नेण्याचे काम ते प्रभावीपणे करत आहेत. बाळासाहेबांचे विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचावेत, यासाठी शिवसैनिक जयंती उत्साहात साजरी करत आहेत, असे त्यांनी सांगितले. महापालिका निवडणुकीदरम्यान राजकारणाच्या वेगवेगळ्या पद्धती पाहायला मिळाल्या. मात्र, जनतेचा कौल स्वीकारून शिवसैनिक पुन्हा जोमाने समाजहितासाठी कामाला लागले आहेत. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांप्रमाणे ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या सूत्रानुसार शिवसैनिकांची वाटचाल सुरू असल्याचे जाधव यांनी स्पष्ट केले. विक्रम राठोड म्हणाले की, स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी नेहमीच गोरगरीब, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेला ताकद देण्याचे काम केले. त्यांनी सामान्य माणसाच्या हातात सत्ता दिली आणि त्याला नेतृत्वाची संधी उपलब्ध करून दिली. संपूर्ण देशाला ज्वलंत हिंदुत्ववादी विचार देणारे ते एकमेव आणि निर्भीड नेतृत्व होते. कोणत्याही दबावाला न झुकता छातीठोकपणे भूमिका मांडणारे बाळासाहेब ठाकरे आजही करोडो शिवसैनिकांसाठी प्रेरणास्थान आहेत. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली खरे शिवसैनिक एकवटले असून, शिवसेनेचे विचार पुढे नेण्यासाठी सर्वजण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.



# स्व. बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती वृक्षारोपणाने साजरी

**अहमदनगर । रयत समाचार**

भारतीय लहुजी सेना व मानवी हक्क अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती पर्यावरणपूरक उपक्रमातून साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात कलमी आंब्याची वृक्षलागवड करून दोन्ही राष्ट्रपुरुषांना अभिवादन करण्यात आले. वृक्षलागवडीसोबतच संवर्धन व जतन करण्याचा संकल्प उपस्थितांनी केला. या कार्यक्रमात माजी नगरसेवक अनिल शेकटकर व मानवी हक्क अभियानचे शहर-जिल्हाध्यक्ष अशोक भोसले यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. भारतीय लहुजी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र प्रमुख सुनील सकट यांच्या पुढाकाराने झालेल्या या उपक्रमास पोलीस दलातील इरफान शेख, संतोष शिरसाठ, किशोर रायमोकर, लखन साळवे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सुनील सकट म्हणाले की, स्व. बाळासाहेब ठाकरे आणि नेताजी सुभाषचंद्र बोस हे सामान्यांच्या हक्कांसाठी व राष्ट्रासाठी लढणारे नेते होते. जयंती केवळ फोटोपूजनापुरती न ठेवता समाजोपयोगी उपक्रमातून साजरी करणे आवश्यक आहे. अनिल शेकटकर यांनीही दोन्ही नेत्यांच्या विचारांची खरी आठवण म्हणजे समाजहित व राष्ट्रहिताचे कार्य असल्याचे सांगितले.

# 'जश्न-ए-हिंदुस्तान' मुशायऱ्यासाठी डॉ. कमर सुरूर यांना निमंत्रण



**अहमदनगर । आबीद खान**

भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी व अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने पारंपरिक मुशायरा व ऐतिहासिक काव्य महोत्सव 'जश्न-ए-हिंदुस्तान' आयोजित करण्यात आला आहे. या भव्य साहित्यिक सोहळ्यासाठी देशातील नामवंत शायरांना निमंत्रित करण्यात आले असून, नगरच्या सुप्रसिद्ध उर्दू शायरा (कवयित्री) डॉ. कमर सुरूर यांनाही विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. उर्दू साहित्यातील त्यांच्या अभ्यासपूर्ण लेखनशैलीसह प्रभावी सादरीकरणासाठी ओळखल्या जाणाऱ्या डॉ. कमर सुरूर यांच्या सहभागामुळे या मुशायऱ्याची शान अधिक वाढणार आहे. साहित्य, संस्कृती आणि देशप्रेम यांचे सुंदर मिश्रण असलेला हा मुशायरा काव्य महोत्सव ता. २६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता मुंबई येथील गेटवे ऑफ इंडिया येथे संपन्न होणार आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेला 'जश्न-ए-हिंदुस्तान' हा कार्यक्रम उर्दू साहित्यप्रेमींसाठी पर्वणी ठरणार असून, देशातील विविध भागांतील रसिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# रेडिओ नगरच्या आरजे स्पर्धेत सीएसआरडीच्या मरियम सय्यद यांनी पटकाविला प्रथम क्रमांक

**अहमदनगर । रयत समाचार**

स्नेहालय संचलित रेडिओ नगर ९०.४ एफएम यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या RJ Contest २०२५ खुल्या गटामध्ये भा.पां. हिवाळे शिक्षणसंस्थेच्या सीएसआरडीतील पत्रकारीता अभ्यासक्रमाची विद्यार्थ्यांनी मरियम मदस्सर सय्यद यांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकाविला. या स्पर्धेमध्ये सहभागी स्पर्धकांना रेडिओ प्रसारणाशी संबंधित संवाद कौशल्य, आवाजातील चढ-उतार (Voice Modulation), विषयाची स्पष्टता आणि सादरीकरण क्षमता दाखवण्याची संधी देण्यात आली होती. मरियमच्या सादरीकरणात प्रभावी संवाद, आत्मविश्वासपूर्ण मांडणी आणि विषयाची शिस्तबद्ध रचना ठळकपणे दिसून आली. याच गुणांच्या जोरावर तिने इतर स्पर्धकांवर सरशी मिळवली. या उल्लेखनीय यशाबद्दल




मरियमला सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार आरजे रुतुजा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. RJ Contest चा उद्देश विविध शैक्षणिक व व्यावसायिक पार्श्वभूमीतील तरुणांमध्ये माध्यम साक्षरता, संवाद कौशल्य आणि सर्जनशील अभिव्यक्ती विकसित करणे हा आहे. मरियमचे यश तिच्या शैक्षणिक तयारीसह माध्यम क्षेत्रातील आवड, मेहनत आणि चिकाटीचे प्रतीक मानले जात आहे.

मरियमच्या यशाबद्दल डॉ. सुरेश पठारे, मेहेरनोश मेहता, सॅम्युअल वाघमारे, विणा दिघे, सुधीर लंके, शिक्षक, सहकारी आणि मित्रमंडळींनी कौतुक केले असून, तिची ही कामगिरी शैक्षणिक गुणवत्तेसोबतच सहशालेय उपक्रमातील सक्रिय सहभागाचे उत्तम उदाहरण ठरत आहे.

# रेसिडेन्शिअल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याचे राष्ट्रीय पातळीवर यश



**अहमदनगर । रयत समाचार**

भारतीय युवा खेल परिषद अंतर्गत आयोजित नॅशनल युवा खेल परिषद या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत रेसिडेन्शिअल कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी दरंदले अभिषेक मच्छिंद्र याने ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अभिषेक याने ८०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवले. या घवघवीत यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, संस्था सचिव विधीतज्ज्ञ विश्वास आठरे, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार विधीतज्ज्ञ दिपलक्ष्मी म्हसे यांच्या उपस्थितीत रेसिडेन्शिअल कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने त्याचा सत्कार समारंभपूर्वक गौरव करण्यात आला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, पर्यवेक्षिका दारकुंडे, क्रीडा संचालक प्रा. संदेश भागवत, प्रा. सुधाकर सुंबे तसेच महाविद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी अभिषेकच्या मेहनतीचे व सातत्याचे विशेष कौतुक करण्यात आले. उपप्राचार्यांनी अभिषेकचे अभिनंदन करत सांगितले की, ''महाविद्यालयातील शिस्तबद्ध वातावरण, नियमित सराव आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवर यश मिळत आहे.'' क्रीडा शिक्षकांनीही त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अभिषेकच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला असून परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# विठ्ठलरुक्मिणी मातेचा भव्य शाही विवाह सोहळा

## विशेष मुंडावळ्या, पोशाखात दैवी दांपत्याचे लग्न

**नगर तालुका । रयत समाचार**

वसंत पंचमीच्या पावन पर्वानिमित्त पिंपळगाव माळवी येथील श्री विठ्ठल मंदिरात श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेचा शाही विवाह सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. या सोहळ्यात विठ्ठल-रुक्मिणी दैवतांना विशेष मुंडावळ्या पोशाख (पारंपरिक राजेशाही वेशभूषा) परिधान करून भव्य लग्नविधी पार पाडण्यात आला. मंदिर परिसर भाविकांनी गजबजला असून कीर्तन, भजन, आरती व मंगल गीतांनी वातावरण आनंदमय झाले होते. विवाह सोहळ्यानिमित्त श्रीकृष्ण महाराज रायकर यांनी केलेले प्रवचन भाविकांच्या मनात घर करून गेले. त्यांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या दैवी प्रेमकथेचे, भक्तीचे आणि वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे तत्त्वज्ञान सुंदर रीतीने सांगितले.

'हा सोहळा फक्त लग्न नाही, तर भक्त आणि परमेश्वर यांच्यातील अनन्यसाधारण नात्याचे प्रतीक आहे,'' असे त्यांनी नमूद केले. त्यांच्या प्रवचनाने अनेक भाविक भावावून गेले. या सोहळ्याचे आयोजन मंदिर ट्रस्ट, स्थानिक भाविक आणि गावकऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नातून पार पडले. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनी या दैवी कार्यक्रमात सहभाग नोंदवला. या पावन सोहळ्यामुळे गावातील धार्मिक वातावरण अधिकच बळकट झाले असून पुढील वर्षीही हा सोहळा अधिक उत्साहात साजरा करण्याची इच्छा भाविकांनी व्यक्त केली.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# जुनं वैभव परत आणण्यासाठी पत्रकारांचे मोलाचे सहकार्य हवे- आ. हेमंत ओगले

## श्रीरामपूर नगरपालिकेतर्फे पत्रकार दिन उत्साहात साजरा

**श्रीरामपूर | सलीमखान पठाण**

श्रीरामपूरचं गत वैभव परत आणण्यासाठी शहर व तालुक्यातील पत्रकारांचे मोलाचे योगदान अपेक्षित असून श्रीरामपूरची पत्रकारिता ही एक वेगळ्या उंचीची आहे. बिनवेशीचं गाव म्हणून गणल्या जाणाऱ्या श्रीरामपूरची उसवलेली विण आपल्याला पुन्हा शिवायची आहे. यामध्ये पत्रकारांचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे, असे प्रतिपादन आमदार हेमंत ओगले यांनी केले. श्रीरामपूर नगरपालिकेमार्फत पत्रकार दिनाचा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

त्याप्रसंगी ओगले बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार रमण मुथा होते. व्यासपीठावर नगराध्यक्ष करण ससाणे, उपनगराध्यक्ष कांचन सानप, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर, पंचायत समितीच्या माजी सभापती वंदना मुरकुटे, लकी सेठी, पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक गाडेकर, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश रक्ताटे, प्रमोद भोसले, अण्णासाहेब डावखर, बाबासाहेब दिघे, सर्व नवनिर्वाचित नगरसेवक, नगरसेविका यांची उपस्थिती होती. आ. ओगले यांनी सुरुवातीलाच 'मै खोज होऊन विचार हू' ही कविता सादर करीत वेगवेगळे विचार आज या राजकीय व्यासपीठावर मांडले गेले. यावेळी झालेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीत १४ नवीन नगरसेवक निवडून आलेले आहेत. प्रचंड दबाव असतानाही पत्रकारांनी नगरपालिका निवडणुकीत आमची बाजू योग्य प्रकारे मांडली. अनेक ठिकाणी पत्रकारांची मुस्कटदाबी होते, मात्र पाठीवर हात ठेवून 'लढ' म्हटले की उत्साह येतो. काही पत्रकार मित्रांनी एकांतात गुपचूप काही गोष्टी आमच्या निदर्शनास आणल्या त्याचा आम्हाला फायदा झाला.



आमच्या यशामध्ये सिंहाचा वाटा पत्रकारांचा आहे. राजकारणात स्पर्धा निकोप असली पाहिजे. या सरकारला सध्या काही फरक पडत नाही आणि अनेक गोष्टी चुकीच्या घडत असताना सरकार त्यांच्याकडे कानाडोळा करीत आहे. त्यामुळे या वातावरणात पत्रकार हे आशेचा किरण आहेत. एक वर्षापासून आमदार निधी जमा झालेला नाही. सरकारने निधी दिलेला नाही. डीपीडीसीचा निधी नाही. विकास कामे कशी करायची. आरोग्य विभागाला एक जानेवारीपासून एक पैसा मिळालेला नाही. तालुक्यातील ११ गावांमध्ये लिंगोत्तर प्रमाण ५० टक्के पेक्षा कमी आहे, ही मोठी चिंतेची बाब आहे. समाज कुठे चालला आहे यासाठी आपल्याला सामाजिक विचार मांडावे लागतील. एकत्रित येऊन काम करावे लागेल. श्रीरामपूरात सुधारणा घडवाव्या लागतील. व्यसनापासून तरुण पिढीला रोखणे मोठे आव्हान आहे. त्यावर अंकुश ठेवावा लागेल. पोलिसांच्या कामगिरीबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. नगराध्यक्ष करण ससाणे यांनी निवडणुकीनंतरच्या घडामोडीमुळे कार्यक्रम घेण्यास उशीर झाला त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. आमच्या राजकीय जडणघडणीत पत्रकारांचा मोठा वाटा आहे. विचारांची देवाण-घेवाण करून आपल्या सहकार्याने शहर पुढे न्यायचे आहे. निवडणुका झाल्या, आता मागचे सगळे विसरून नवीन सुरुवात करूया. वादावादी आणि राजकारणाला गाव कंटाळले आहे. चांगल्या कामाची सुरुवात केली पाहिजे.

सर्व नगरसेवकांना बरोबर घेऊन काम करायचं आहे. मिळालेल्या संधीचा प्रत्येक सेकंद वापरून सकारात्मक कार्य करायचे आहे. श्रीरामपूरची आज निर्माण झालेली ओळख बदलायची आहे. फेब्रुवारीमध्ये पहिली व्याख्यानमाला सुरू करू. त्याचबरोबर सांस्कृतिक वैभव परत आणण्याचा प्रयत्न करू. वसंतराव देशमुख पत्रकारिता पुरस्कार आणि व्याख्यानमाला लवकर सुरू करू. वर्तमानपत्रातून होणाऱ्या टीका-टिप्पणीला सकारात्मक पद्धतीने घेऊन काम करू. चुकीच्या कामावर अंकुश ठेवण्याचे काम पत्रकारांनी करावे. श्रीरामपूरचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणि आदर्श श्रीरामपूर घडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी पत्रकारांच्या वतीने नागेश सावंत, शिवाजी पवार, भाऊसाहेब काळे, विष्णू वाघ आदींनी, तसेच माजी सभापती वंदना मुरकुटे, नगरसेविका मंजुश्री मुरकुटे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. उपस्थित सर्व पत्रकारांचा पालिकेतर्फे यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची अध्यक्षीय सूचना माऊली मुरकुटे यांनी मांडली. त्यास बाबासाहेब दिघे यांनी अनुमोदन दिले. प्रास्ताविक सचिन गुजर यांनी केले. सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार सलीमखान पठाण यांनी केले तर आभार शिक्षण समितीचे सभापती राजेंद्र पवार यांनी मानले.

> **श्रीरामपूरच्या तरुणाईला शिस्त लावण्यासाठी शाळा-कॉलेजात जाऊन त्यांच्यासमोर विचार मांडावे लागतील. राम, रहीम, ईसा एकत्र येऊन आपल्याला श्रीरामपूरची विण शिवावी लागेल. श्रीरामपूरचे जुने वैभव आणि नाव परत आणू.**
> **- हेमंत ओगले,** आमदार



## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंती उत्साहात साजरी

**संगमनेर | नितीनचंद्र भालेराव**

हिवरगाव पावसा येथे कॅनरा बँक चौकात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना (उबाठा) तालुकाप्रमुख अमर कतारी, युवासेना जिल्हाध्यक्ष अमित चव्हाण, संगमनेर शहराध्यक्ष रवींद्र कानकाटे, स्वाभिमानी संघटनेचे नेते नाना थोरात, सरपंच सुभाष गडाख, सेवानिवृत्त शिक्षक प्रा. बाबुराव पावसे, वृक्षमित्र गणपत पावसे, शिवसेना तालुका उपप्रमुख भिमाशंकर पावसे, ज्येष्ठ संपादक यादवराव पावसे, त्रिंबक शिंदे वाघापूर शाखाध्यक्ष यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. समाजसुधारकांची समृद्ध परंपरा असलेला महाराष्ट्र पुरोगामी आहे, पण मराठी माणूस मागेच राहिला आहे. महाराष्ट्रात सुविधा आहेत, पण मराठी माणूस दुविधेत आहे. महाराष्ट्रात मराठी तरुणांनी उद्योग-व्यवसाय उभे करावेत असा दूरदृष्टीचा विचार हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी दिला. महाराष्ट्रातच मराठी माणसाला रोजगार, संरक्षण, स्वाभिमान मिळवून देण्याचे काम स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी केले. त्यांच्या विचारांचे मोठे नेतृत्व शिवसैनिकांच्या सहकार्याने संगमनेर तालुक्यात उभे करू, असा विश्वास शिवसेना संगमनेर तालुकाप्रमुख अमर कतारी यांनी व्यक्त केला. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक प्रा. बाबुराव पावसे यांनी बाळासाहेबांच्या आठवणींना उजाळा दिला. याप्रसंगी संदीप पावसे, आप्पासाहेब गडाख, वसंत पावसे, अशोक पावसे, अशोक नेहे, संपत पावसे, भास्कर पावसे, रमेश पावसे, भाऊसाहेब पावसे, समाधान भालेराव, हरी जाधव, भाऊराव जाधव, संजय पावसे, रामनाथ जाधव, सुखदेव पावसे, सुधाकर पावसे, अरुण नरवडे, बाबासाहेब पावसे, नाना पावसे, गेणू पावसे, तुकाराम पावसे यांच्यासह हिवरगाव पावसा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भुयारी गटार योजनेमुळे रोगराई कमी होईल - अमोल गर्जे

## शहरासाठी २२२ कोटींची बंदिस्त गटार योजना मंजूर



**पाथर्डी | नितीन गटाणी**


शहराची गरज ओळखून पुढील ३० वर्ष अडचण येणार नाही अशा पद्धतीने सुमारे २२२ कोटींची बंदिस्त गटार योजना आमदार मोनिकाताई राजळे यांच्या पाठपुराव्यातून मंजूर झाली. शहराअंतर्गत तब्बल १३० कि.मी. लांबीचे काम या योजनेच्या माध्यमातून होणार आहे. यामुळे शहर परिसरातील रोगराई कमी होणार असून नागरिकांच्या आजाराचे प्रमाणही कमी होणार असल्याचे प्रतिपादन नगरसेवक अमोल गर्जे यांनी केले. शहरातील क्रांती चौक ते जय भवानी चौक या परिसरातील बंदिस्त गटार योजनेच्या कामाचा शुभारंभ पालिका पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी नगरसेवक गर्जे बोलत होते. यावेळी उपनगराध्यक्षा मंगल कोकाटे, गटनेच्या शारदा गर्जे, रामनाथ बंग, प्रशांत शेळके, प्रतीक खेडकर, मुकुंद लोहिया, ॲड. सुरेश आव्हाड, योजनेचे प्रकल्प व्यवस्थापक विकी गुप्ता, मानस पाल, सोमनाथ रोडी, विनोद राठोड, महेश बाहेती, बाळासाहेब शहाणे, सतीश पानगे, अनिल मंत्री, सोमनाथ बंग, संजय चिंतामणी, कन्हैया सोनवणे, अमित सरोदे, किरण पुरी उपस्थित होते. पुढे बोलताना गर्जे म्हणाले की, मागील अनेक वर्षांपूर्वी केलेली गटार योजना आता पूर्ण क्षमतेने काम करत नाही. यामुळे अनेक ठिकाणी नागरिकांच्या घरामधील पाण्याचा निचरा होताना अडथळा निर्माण होत होता. तर काही ठिकाणी गटार लिकेज होऊन पिण्याच्या पाण्यामध्ये मैला मिश्रित पाणी जमा होत होते. यामुळे नागरिकांना अनेक वेळा अशुद्ध पाणीपुरवठा होत होता. आता मात्र नवीन भुयारी गटार योजनेमुळे सर्व समस्या दूर होतील. विशेष म्हणजे पालिका हद्दीतील सर्व भागातील बंदिस्त गटारीतील मैला मिश्रित पाणी एकाच ठिकाणी जमा होणार आहे. त्याचे शुद्धीकरणही करण्यात येणार असल्याने विविध भागातील रोगराई कमी होणार आहे. आगामी काळात आमदार मोनिका राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली, नगराध्यक्ष अभय आव्हाड व पालिका पदाधिकारी, अधिकारी यांच्या सहकार्यातून नागरिकांना विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देऊ, असे शेवटी नगरसेवक गर्जे म्हणाले.



# स्व. अथर्व कर्डीले टुडी-ईको मशीनरीचे लोकार्पण

**बेलापूर | शफीक बागवान**

कुटुंबाचे अकाली भविष्य हरपले असतानाही छातीवर दगड ठेऊन रुग्णसेवेच्या माध्यमातून स्व. अथर्वच्या स्मृती चिरंतन जपण्याचा प्रमोद कर्डीले परिवाराचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन आ. हेमंत ओगले यांनी केले. पुणे येथे उच्च शिक्षण घेत असलेल्या अथर्व प्रमोद कर्डीले याचे दुर्दैवी अपघातात निधन झाले. त्याच्या स्मृतीप्रित्यर्थ कर्डीले परिवाराने साखर कामगार हॉस्पिटलला आधुनिक टुडी ईको ही अद्ययावत वैद्यकीय मशीनरी घेण्यासाठी पंधरा लाख रुपये धनादेशाद्वारे दान म्हणुन सुपूर्द केले. त्याद्वारे स्व. अथर्वच्या नावाने टुडी-ईको कक्षाचे लोकार्पण करण्यात आले.त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन आ. ओगले बोलत होते. अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, राहुरीच्या माजी नगराध्यक्षा डॉ. उषा तनपुरे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर, बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, बेलापूरचे माजी सरपंच भरत साळुंके आदींनी स्व. अथर्वच्या आठवणी सांगुन मनोगत व्यक्त करीत या सामाजिक उपक्रमाबद्दल कर्डीले परिवाराचे कौतुक केले. याप्रसंगी उषा कर्डीले, प्रमोद कर्डीले, मनिषा कर्डीले, विठ्ठल कर्डीले, अशोक कर्डीले, प्रल्हाद कर्डीले, साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्टचे सचिव अविनाश आपटे, इंजिनिअर अँड आर्किटेकट असोसिएशनचे पदाधिकारी, डॉ. रविंद्र जगधने, डॉ. शरद सातपुते यांच्यासह मोठ्या संख्येने स्नेही उपस्थित होते. प्रास्ताविक, स्वागत व सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार प्रा. ज्ञानेश गवले यांनी केले. तर साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्टचे व्यवस्थापकीय विश्वस्त ज्ञानदेव पा. आहेर यांनी आभार मानले.



कुकाणा (ता. नेवासा) येथील ह.भ.प. सुभाष पवार यांनी नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सन्मान करताना वरखेड गावचे सरपंच विनोद पाटील ढोकणे व माजी जिल्हा परिषद सदस्य पुरुषोत्तम धोंडीराम सर्जे. (छाया : विजय खंडागळे, सोनई)

## बाळासाहेब घायाळ यांचे निधन



**नेवासा | रयत समाचार**

श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथील बाळासाहेब मारुती घायाळ (वय ५५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील, दोन भाऊ, दोन बहिणी, दोन मुले, भावजय, सून, पुतणे असा मोठा परिवार आहे. अमोल आणि रवींद्र यांचे ते वडील होत. तसेच हभप बाबासाहेब घायाळ व दादासाहेब घायाळ यांचे ते कनिष्ठ बंधू होत.

# नागवडे साखर कारखाना व्हा. चेअरमनपदी मेघा औटी

## आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात पहिल्यांदाच महिलेला संधी

**श्रीगोंदा | माधव बनसुडे**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमनपदी मेघा संदीप औटी यांची एकमताने निवड करण्यात आली. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने तसेच कारखान्याच्या इतिहासात प्रथमच एका महिलेला व्हा. चेअरमनपदाची संधी मिळाल्याने सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कारखान्याच्या रिक्त असलेल्या व्हा. चेअरमन पदाच्या निवडीसाठी शुक्रवार, ता. २३ रोजी सकाळी ११ वाजता कारखान्याच्या अतिथीगृहातील सभागृहात संचालक मंडळाची विशेष सभा पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी संजय गोंदे हे होते. प्रारंभी त्यांनी निवडणूक प्रक्रियेची माहिती संचालकांना दिली. यानंतर व्हा. चेअरमन पदासाठी मेघा औटी यांचे नाव



संचालिका मंदाकिनी मारुती पाचपुते यांनी सुचविले, तर संचालक सावता लक्ष्मण हिरवे यांनी त्यास अनुमोदन दिले. कोणताही विरोध न झाल्याने औटी यांची एकमताने निवड जाहीर करण्यात आली. यावेळी बोलताना कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे म्हणाले की, केंद्र शासनाने चालू वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून घोषित केले आहे. त्याचबरोबर कारखान्याचा ऐतिहासिक ५१ वा गळीत हंगाम सुरू आहे. या पार्श्वभूमीवर महिलांना नेतृत्वाची संधी देण्याचा निर्णय सर्व संचालकांनी एकमताने घेतला. कारखान्याच्या इतिहासात प्रथमच एका सक्षम महिलेला व्हा. चेअरमनपद मिळाल्याचा आम्हाला विशेष आनंद असल्याचे त्यांनी सांगितले.

मेघा औटी या गेल्या पंधरा वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून वेळू गावच्या सरपंचपदाची जबाबदारी त्यांनी सक्षमपणे पार पाडली आहे. त्यांच्या अनुभवाचा कारखान्याच्या प्रगतीस निश्चितच लाभ होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या सभेस कारखान्याचे सर्व संचालक, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे, खातेप्रमुख, कार्यकर्ते व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. औटी यांच्या निवडीबद्दल कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे, सर्व संचालक मंडळ, जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका अनुराधा नागवडे, तालुका दूध संघाचे चेअरमन दिलीप वागस्कर आदी मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# डॉ. होमी जहांगीर भाभा

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**

# श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा ११ कोटींचा अर्थसंकल्प

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा सन २०२६२०२७ या आर्थिक वर्षासाठी तब्बल ११ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पात एकूण ५ कोटी रुपयांचे अपेक्षित उत्पन्न गृहित धरले असून बाजार समितीस सुमारे १ कोटी ३८ लाख रुपयांचा वाढीव शिल्लक लाभ होणार आहे, सभापती सुधीर नवले यांनी हा अर्थसंकल्प मांडला.

बाजार समितीची निवडणूक ३० एप्रिल २०२३ रोजी पार पडली असून १३ मे २०२३ रोजी नवे संचालक मंडळ अस्तित्वात आले. आ. हेमंत ओगले, माजी आ. भानुदास मुरकुटे आणि नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीचे कामकाज प्रभावीपणे सुरू आहे. अर्थसंकल्पामध्ये ४ कोटी ३० लाख रुपयांची विविध विकासकामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. यामध्ये श्रीरामपूर येथील शेती महामंडळाची जमीन अधिग्रहण करणे, बाजार समिती कार्यालयासमोरील मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरण, भाजीपाला मार्केटमध्ये नवीन भाजीपाला शेड उभारणी, टाकळीभान येथे अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण, टाकळीभान उपबाजार आवारात नवीन पेट्रोल पंप उभारणी तसेच श्रीरामपूर येथे नियोजित डाळिंब मार्केट उभारणीचा समावेश आहे.

दरम्यान, सध्या सुरू असलेल्या विकासकामांमध्ये श्रीरामपूर येथील कांदा मार्केटमध्ये सुमारे २ कोटी रुपये खर्चून रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात आले आहे.

श्रीरामपूर येथे १५ नवीन दुकानगाळ्यांची कामे पूर्ण झाली असून बेलापूर उपबाजार आवारात ४ कोटी रुपये खर्चून रस्ते काँक्रीटीकरणाची कामे यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली आहेत. बाजार समितीचे कामकाज अत्यंत पारदर्शक, काटकसरीचे आणि शेतकरी हित डोळ्यांसमोर ठेवून चालविले जात असल्याचे सभापती सुधीर नवले व सचिव साहेबराव वाबळे यांच्यासह संचालक मंडळाने सांगितले.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत धनगरवाडी शाळेचे यश





**सोनई । विजय खंडागळे**

नुकत्याच झालेल्या नेवासा तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनगरवाडीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. लहान गटात मुलांमध्ये इयत्ता पाचवीतील ज्ञानेश्वर संजय पालवे याने ५० मीटर धावणे व लांब उडीत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला. तर मुलींमध्ये इयत्ता पाचवीतील स्नेहल बाबासाहेब कातोरे हिने देखील लांब उडी व ५० मीटर धावणे मध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला.

त्यांच्या या यशाबद्दल नेवासा तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी साईलता सामलेटी, घोडेगाव बीटचे शिक्षणविस्तार अधिकारी डॉ. संजय कळमकर, केंद्रप्रमुख लाटे तसेच धनगरवाडी गावचे सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन केले असून जिल्हास्तरासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक विठ्ठल नागरगोजे, वर्गशिक्षिका प्रतिभा आव्हाड, शिक्षक भगवान दराडे, चौधरे शशिकला, सुनील ढेरे, चंदना सोनवणे, मंगल कोरडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# गोव्याच्या ट्रॅकवर अहिल्यानगरची सुवर्णधाव

## शुभम हंबीररावला २०० मीटर ॲथलेटिक्समध्ये सुवर्णपदक



**गोवा । रयत समाचार**

भारतीय युवा खेल परिषद अंतर्गत गोवा येथे पार पडलेल्या नॅशनल गेम्स २०२५-२६ स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचा सुपुत्र शुभम सीमा अरुण हंबीरराव याने ॲथलेटिक्सच्या २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. २०, २१ व २२ जानेवारी रोजी गोव्यातील पोद्देम स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, मापुसा येथे झालेल्या या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशातील विविध राज्यांमधील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. तीव्र स्पर्धेत शुभमने दमदार कामगिरी करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. शुभम हा भा.पां. हिवाळे शिक्षणसंस्थेच्या सीएसआरडी मधील एम.एस. डब्ल्यू. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी असून, राणा सिंग व शंकर गायकवाड पाटील यांच्या हस्ते त्याला ट्रॉफी व पदक प्रदान करण्यात आले. अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील हळगाव येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या शुभमच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

आई-वडील शेती करून कुटुंबाचा गाडा चालवतात. आजी-आजोबा, चुलता-चुलती व त्यांची मुले असे एकत्र कुटुंब असलेल्या या घरातून राष्ट्रीय सुवर्णपदक विजेता घडल्याने गावात आनंदाचे वातावरण आहे.या यशाबद्दल सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांनी शुभमचे विशेष अभिनंदन केले असून, त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. शुभमच्या या सुवर्णयशाने अहिल्यानगर जिल्ह्याचा क्रीडाक्षेत्रातील लौकिक आणखी उजळला आहे.



# उखलगावात स्वच्छता मोहीम उत्साहात

## 'आपले गाव, आपली जबाबदारी'चा ग्रामस्थांकडून संदेश

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत उखलगाव ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी श्रमदान करत सहभाग नोंदवून 'आपले गाव, आपली जबाबदारी' ही भावना प्रत्यक्ष कृतीतून अधोरेखित केली.

या मोहिमेत गावाची वेश, मारुती मंदिर व भैरवनाथ मंदिर परिसर तसेच जुनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसराची स्वच्छता करण्यात आली. मंदिर परिसर स्वच्छ व पवित्र राहावा यासाठी पाणीपुरवठा करून तसेच प्रत्यक्ष श्रमदानातून ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेतला. उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व ग्रामस्थांचे ग्रामपंचायतीच्या वतीने मनः पूर्वक आभार मानण्यात आले. ग्रामस्थांच्या एकजुटीमुळेच श्रद्धास्थाने, शाळा व सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ, सुंदर व प्रसन्न ठेवणे शक्य होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या स्वच्छता मोहिमेचे पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी राणी फराटे तसेच विस्तार अधिकारी यादव यांनी विशेष कौतुक केले. उखलगाव ग्रामपंचायतीच्या नियोजनबद्ध, पारदर्शक कामकाजासह लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे त्यांनी विशेष अभिनंदन केले.

# ई-पीक पाहणीसाठी आज शेवटचा दिवस - तहसीलदार वाघ

**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'ई-पीक पाहणी' प्रकल्पांतर्गत रब्बी हंगामातील पिकांची नोंदणी करण्यासाठी आता केवळ एक दिवसाचा अवधी शिल्लक आहे. २४ जानेवारी २०२६ पर्यंत तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची नोंदणी अनिवार्यपणे पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी केले आहे. शासनाने १० डिसेंबर २०२५ पासून रब्बी हंगामासाठी ही मोहीम सुरू केली आहे. शेतकऱ्यांनी स्वतःच्या ७/१२ उताऱ्यावर पिकांची अचूक नोंद करण्यासाठी 'ई-पीक पाहणी' या मोबाईल ॲपचा वापर करणे आवश्यक आहे. ज्या शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल नाही, त्यांनी गावपातळीवर तलाठी, कोतवाल किंवा नियुक्त ई-पीक पाहणी सहाय्यकांची मदत घ्यावी, अशी सोयही प्रशासनाकडून करण्यात आली आहे. पिकांची नोंद विहित मुदतीत केली नाही, तर ७/१२ उताऱ्यावरील पीक पेरा रकाना कोरा राहू शकतो. यामुळे भविष्यात पीक विमा, नैसर्गिक आपत्तीची भरपाई आणि शासनाच्या विविध कृषी योजनांचे अनुदान मिळवण्यात अडचणी येऊ शकतात. त्यामुळे श्रीरामपूर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी विलंब न करता उद्यापर्यंत आपली पीक नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार मिलिंदकुमार वाघ व तहसील प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# डोंगरगण शाळेत 'रामेश्वर विद्यार्थी बचत बँके'चा शुभारंभ

## विद्यार्थ्यांच्या हाती बँकेची धुरा



**नगर तालुका । रयत समाचार**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डोंगरगण येथे थोर स्वातंत्र्यसेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'रामेश्वर विद्यार्थी बचत बँके'चा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या बँकेचे कामकाज पूर्णपणे विद्यार्थ्यांमार्फत पाहिले जाणार असून या अनोख्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन व्यंकटेश मल्टी स्टेट सर्व्हिसेसचे झोनल मॅनेजर ज्ञानेश्वर काकडे आणि ग्रामपंचायत सदस्य मेजर सर्जेराव मते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कोमल चांदणे आणि उपाध्यक्ष रवींद्र कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थी चैतन्य चांदणे याने नेताजींच्या वेशभूषेत हजेरी लावत उपस्थितांचे लक्ष वेधले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते फीत कापून व बँकेच्या नामफलकाचे अनावरण करून बचत बँकेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी बँकेत प्रतीकात्मक रक्कम जमा करून विद्यार्थ्यांना खास तयार करण्यात आलेल्या पासबुकांचे वितरण केले व प्रत्यक्ष व्यवहाराला सुरुवात झाली. या बँकेचे कामकाज दर मंगळवारी आणि शुक्रवारी दुपारी दोन ते तीन या वेळेत चालणार असून सर्व जबाबदारी विद्यार्थी स्वतः सांभाळणार आहेत. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वर काकडे यांची मुलाखत घेत बँकिंग आणि बचतीचे महत्त्व जाणून घेतले. या मुलाखतीचे प्रास्ताविक कुमारी अनुष्का हिलगुडे हिने केले, तर आभार अथर्व चांदणे याने मानले. मार्गदर्शनात ज्ञानेश्वर काकडे यांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

**पहिल्याच दिवशी पाचशे पंचवीस रुपये बँकेत जमा, ग्रामपंचायत सदस्य व शाळेचे माजी विद्यार्थी सर्जेराव मते यांनीही बचत बँकेत खाते काढले, शाळेचे सर्व कामकाज विद्यार्थी स्वतः करणार, तसेच बँकेत जमा पैशातून भविष्यात विद्यार्थी वस्तू भांडार सुरू करण्याचा शाळेचा मानस आहे.**

जिल्हा परिषद शाळा ही विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणारे ठिकाण आहे. शाळेने आणि पालकांनी आपल्याला खूप काही दिले आहे, त्यामुळे येथूनच उत्तम शिक्षण घेऊन जीवनात यशस्वी व्हा,'' असा मूलमंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिला, तसेच बँकेसाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. माजी सैनिक व ग्रामपंचायत सदस्य सर्जेराव मते यांनीही या उपक्रमाचे स्वागत केले. शाळेचे माजी विद्यार्थी असल्याने आपणही विद्यार्थी बचत बँकेत खाते उघडून नियमित व्यवहार करणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश्वर चेडे यांनी केले. तर भविष्यात शाळेत 'विद्यार्थी वस्तू भांडार' सुरू करण्याचा मानस व्यक्त करत राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक नारायण मंगलारम यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# अबाल वृद्ध, महिला-युवकांसाठी उपक्रम राबवणार- दराडे

## सुवर्णयुग परिवार ट्रस्टकडून गणेशजयंती साजरी

**पाथर्डी । नितीन गटाणी**

बुद्धीची देवता म्हणून संबोधल्या जाणाऱ्या श्री गणरायाच्या जन्मोत्सवानिमित्त परिसरातील भाविक भक्तांनी एकत्रित आनंद साजरा करावा, यासाठी मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे प्रतिपादन सुवर्णयुग परिवारचे अध्यक्ष संजय दराडे यांनी केले. श्री गणेश जयंतीनिमित्त सालाबादप्रमाणे शहरातील नवी पेठ येथील सुवर्णयुग परिवार ट्रस्टच्या सुवर्णसिद्धी श्री गणेश मंदिरासमोर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दराडे बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून बाळासाहेब जिरेसाळ, मधुकर मानूरकर, संतोष भागवत, नगरसेवक अमोल गर्जे, राम चिंतामणी, सुनील गुगळे, सुनील मानूरकर, पांडुरंग शिळवणे, सुनील चिंतामणी, वैभव मानूरकर, कृष्णा वेदपाठक आदी उपस्थित होते. पुढे बोलताना दराडे म्हणाले की, सुवर्णयुग परिवारच्या वतीने गणेशोत्सवासह वर्षभर विविध उपक्रम साजरे केले जातात. विशेषतः श्री गणरायाचा जन्मोत्सव मंडळाच्या वतीने सण-उत्सवाप्रमाणे साजरा केला जातो. या दिवशी विविध सामाजिक उपक्रमांसह सायंकाळी शहर परिसरातील भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. यामुळे या उत्सवाचा आनंद निश्चितच द्विगुणीत होतो. आगामी काळातही अबाल वृद्धांसह महिला व युवकांसाठी विविध उपक्रम राबवू, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब जिरेसाळ यांनी केले. सूत्रसंचालन सुनील भांगे यांनी केले तर मोदक मानूरकर यांनी आभार मानले.